मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 2024-2025 या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकामधील अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षाखाली रु.1.75 कोटी रुपये तरतुद करण्यात आलेली आहे. सदर नगररचना व अतिक्रमण विभागातील सहा.विधी अधिकारी यांचे ठोक मानधनाचे एकूण वार्षिक अंदाजित खर्च रु.14,50,000/- तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच श्रीम.अमीता मंगेश करलाद सहा.विधी अधिकारी (ठोक मानधन) यांची मुदत दि.05/12/2024 रोजी संपुष्टात येणार असल्यामुळे दि.09/12/2024 ते दि.08/06/2025 रोजी 06 महिन्यांकरीता मुदतीचे नविकरण करण्याबाबत मा.आयुक्त महोदय यांनी दि.17/09/2024 रोजी मंजूरी दिलेली आहे.

सबब आगामी कालावधीमध्ये विधानसभा निवडणूक-2024 रोजीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे तसेच नगर रचना विभागाची आवश्यकता पाहता श्रीम.अमीता मंगेश करलाद सहा.विधी अधिकारी (ठोक मानधन) यांची मुदत दि.05/12/2024 रोजी संपुष्टात येणार असल्यामुळे दि.06/12/2024

रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.07/12/2024 व दि.08/12/2024 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.09/12/2024 ते दि.08/06/2025 पर्यंत 06 महिन्यांकरीता रु.40,000/- ठोक मानधनावर नियुक्तीचे नविकरण करुन आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस विनंती आहे, असा प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २०५ दिनांक ४ / १० /2024

"नगररचना विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत श्री. अमिता मंगेश करलाद, सहा. विधी अधिकारी यांचे नियुक्तीचे नविकरण करणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "श्रीम.अमीता मंगेश करलाद सहा.विधी अधिकारी (ठोक मानधन) यांची मुदत दि.05/12/2024 रोजी संपुष्टात येणार असल्यामुळे दि.06/12/2024 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.07/12/2024 व दि.08/12/2024 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.09/12/2024 ते दि.08/06/2025 पर्यंत 06 महिन्यांकरीता रु.40,000/- ठोक मानधनावर नियुक्तीचे नविकरण करुन आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे."

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

दि. ०४ / १० /2024

(गोषवारा)

प्रकरण क्र. :- २०६ मिरा भाईंदर महानगरपालिकेतील शिक्षण विभागासाठी ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत प्राथमिक व माध्यमिक शिक्षक यांच्या वाढीव मासिक मानधनाबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी ठोक मानधनावर माध्यमिक शिक्षकांची 15 पदे भरणेबाबत दि.26/04/2023 व दि.15/05/2023 अन्वये जाहिर सुचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी माध्यमिक शाळेतील इयत्ता 09 वी व 10 वी च्या वर्गांसाठी विषयानुसार ठोक मानधानावर एकुण 15 शिक्षकांची मागणी करण्यात आली होती. दि.16/06/2023 व दि.10/07/2023 रोजीच्या आदेशान्वये माध्यमिक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या अर्जाच्या अनुषंगाने ठोक मानधनावरील प्राथमिक व माध्यमिक शिक्षक पदाची दि.06/06/2023 रोजी मुलाखत घेण्यात आली. त्याअनुषंगाने शैक्षणिक गुणानुक्रमे व मुलाखतीनुसार प्राथमिक व माध्यमिक शिक्षक उमेद्वारांची निवड व प्रतिक्षा यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व नोटीस बोर्डावर दि.13/06/2023 अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निवड व प्रतिक्षा यादी याची मुदत 10 महिने असल्यामुळे प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती देता येणार नाही. त्यामुळे निवड प्रक्रिया राबविण्याबाबत मा.अतिरिक्त आयुक्त (1) यांनी निर्देश दिलेले आहेत.

शिक्षण विभागाने प्राथमिक शिक्षकांचे मासिक रु.15,000/- मानधनावरुन रु.30,000/- मासिक मानधन व माध्यमिक शिक्षकांचे ठोक मानधन रु.20,000/- वरुन मासिक मानधन रु. 35,000 करणेबाबत दि.13/08/2024 रोजीच्या पत्रान्वये शिक्षण विभागाने विनंती केलेली आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षकांचे ठोक मासिक मानधन रु.30,000/- व माध्यमिक शिक्षकांचे ठोक मासिक मानधन रु.35,000/- करणे उचित होईल.

सद्यस्थितीत शिक्षण विभागाच्या सन 2024-25 च्या मूळ अंदाजपत्रकातील मंजूर तरतूदीनुसार रु.150 लाख तरतूद करण्यात आलेली आहे. शिक्षण विभागातील ठोक मानधनावरील 38 शिक्षक (प्राथमिक शिक्षक - 24 व माध्यमिक शिक्षक - 14) यांची मुदत दि.16/03/2024 रोजीपर्यंत नियुक्तीचे नविकरण करण्यात आलेले आहे. शिक्षण विभागामधील ठोक मानधनावरील कार्यरत प्राथमिक शिक्षक - 24 यांचे प्रति शिक्षक मासिक ठोक मानधन रु.30,000/- प्रमाणे मासिक खर्च रु. 7,20,000/- व माध्यमिक शिक्षक 14 यांचे प्रति शिक्षक मासिक ठोक मानधन रु.35,000/- प्रमाणे मासिक खर्च रु.4,90,000/- असे एकूण 38 शिक्षक (प्राथमिक व माध्यमिक) यांचे रु.12,10,000/- इतका खर्च असून 10 महिन्यासाठी रु.1,21,00,000/- (अक्षरी रु. एक कोटी

एकविस लाख मात्र) इतका खर्च येत आहे. शिक्षण विभागातील ठोक मानधनावरील प्राथमिक शिक्षक - 24 यांचे मासिक मानधन रु.30,000/- व माध्यमिक शिक्षक-14 यांचे मासिक मानधन रु.35,000/- असे एकूण 38 शिक्षक यांचे वाढीव ठोक मानधन दि.01/09/2024 रोजीपासून लागू करणेसाठी मा.आयुक्त महोदय यांनी दि.16/09/2024 रोजी मंजूरी दिलेली आहे.

सबब शिक्षण विभागातील ठोक माधनावर तात्पुरत्या स्वरुपात प्राथमिक शिक्षक - 24 प्रती मासिक रु.30,000/- व माध्यमिक शिक्षक-14 यांचे प्रती मासिक रु.35,000/- मानधन वाढ दि.01/09/2024 पासून लागु करणेस तसेच रु.1,21,00,000/- (अक्षरी रु. एक कोटी एकविस लाख मात्र) इतक्या होणा-या खर्चाबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(संजय दोंदे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. २७/०९/२०२४
रजिस्टर नोंद अ. क्र. १९९ वर्ष २०२४/२५
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

दि. ४ / १० /2024

प्रकरण क्र.२०६:- मिरा भाईंदर महानगरपालिकेतील शिक्षण विभागासाठी ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत प्राथमिक व माध्यमिक शिक्षक यांच्या वाढीव मासिक मानधनाबाबत.

कार्यालयीन प्रस्ताव

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी ठोक मानधनावर माध्यमिक शिक्षकांची 15 पदे भरणेबाबत दि.26/04/2023 व दि.15/05/2023 अन्वये जाहिर सुचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी माध्यमिक शाळेतील इयत्ता 09 वी व 10 वी च्या वर्गांसाठी विषयानुसार ठोक मानधानावर एकुण 15 शिक्षकांची मागणी करण्यात आली होती. दि.16/06/2023 व दि.10/07/2023 रोजीच्या आदेशान्वये माध्यमिक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या अर्जाच्या अनुषंगाने ठोक मानधनावरील प्राथमिक व माध्यमिक शिक्षक पदाची दि.06/06/2023 रोजी मुलाखत घेण्यात आली. त्याअनुषंगाने शैक्षणिक गुणानुक्रमे व मुलाखतीनुसार प्राथमिक व माध्यमिक शिक्षक उमेद्वारांची निवड व प्रतिक्षा यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व नोटीस बोर्डावर दि.13/06/2023 अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निवड व प्रतिक्षा यादी याची मुदत 10 महिने असल्यामुळे प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती देता येणार नाही. त्यामुळे निवड प्रक्रिया राबविण्याबाबत मा.अतिरिक्त आयुक्त (1) यांनी निर्देश दिलेले आहेत.

शिक्षण विभागाने प्राथमिक शिक्षकांचे मासिक रु.15,000/- मानधनावरुन रु.30,000/- मासिक मानधन व माध्यमिक शिक्षकांचे ठोक मानधन रु.20,000/- वरुन मासिक मानधन रु. 35,000 करणेबाबत दि.13/08/2024 रोजीच्या पत्रान्वये शिक्षण विभागाने विनंती केलेली आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षकांचे ठोक मासिक मानधन रु.30,000/- व माध्यमिक शिक्षकांचे ठोक मासिक मानधन रु.35,000/- करणे उचित होईल.

सद्यस्थितीत शिक्षण विभागाच्या सन 2024-25 च्या मूळ अंदाजपत्रकातील मंजूर तरतूदीनुसार रु.150 लाख तरतूद करण्यात आलेली आहे. शिक्षण विभागातील ठोक मानधनावरील 38 शिक्षक (प्राथमिक शिक्षक - 24 व माध्यमिक शिक्षक - 14) यांची मुदत दि.16/03/2024 रोजीपर्यंत नियुक्तीचे नविकरण करण्यात आलेले आहे. शिक्षण विभागामधील ठोक मानधनावरील कार्यरत प्राथमिक शिक्षक - 24 यांचे प्रति शिक्षक मासिक ठोक मानधन रु.30,000/- प्रमाणे मासिक खर्च रु. 7,20,000/- व माध्यमिक शिक्षक 14 यांचे प्रति शिक्षक मासिक ठोक मानधन रु.35,000/- प्रमाणे मासिक खर्च रु.4,90,000/- असे एकूण 38 शिक्षक (प्राथमिक व माध्यमिक) यांचे रु.12,10,000/- इतका खर्च असून 10 महिन्यासाठी रु.1,21,00,000/- (अक्षरी रु. एक कोटी एकविस लाख मात्र) इतका खर्च येत आहे. शिक्षण विभागातील ठोक मानधनावरील प्राथमिक शिक्षक - 24 यांचे मासिक मानधन रु.30,000/- व माध्यमिक शिक्षक-14 यांचे मासिक मानधन रु.35,000/- असे एकूण 38 शिक्षक यांचे वाढीव ठोक मानधन दि.01/09/2024 रोजीपासून लागू करणेसाठी मा.आयुक्त महोदय यांनी दि.16/09/2024 रोजी मंजूरी दिलेली आहे.

सबब शिक्षण विभागातील ठोक माधनावर तात्पुरत्या स्वरुपात प्राथमिक शिक्षक - 24 प्रती मासिक रु.30,000/- व माध्यमिक शिक्षक-14 यांचे प्रती मासिक रु.35,000/- मानधन वाढ दि.01/09/2024 पासून

लागु करणेस तसेच रु.1,21,00,000/- (अक्षरी रु. एक कोटी एकविस लाख मात्र) इतक्या होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळावी असा कार्यालयीन प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २०६ दिनांक ४/१०/2024

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील शिक्षण विभागासाठी ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत प्राथमिक व माध्यमिक शिक्षक यांच्या वाढीव मासिक मानधनाबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिकेतील शिक्षण विभागातील ठोक मानधनावरील प्राथमिक शिक्षक - 24 यांचे मासिक ठोक मानधन रु.30,000/- व माध्यमिक शिक्षक-14 यांचे मासिक ठोक मानधन रु.35,000/- असे एकूण 38 शिक्षक यांचे वाढीव ठोक मानधन दि.01/09/2024 रोजीपासून लागू करणेस तसेच रु.1,21,00,000/- (अक्षरी रु. एक कोटी एकविस लाख मात्र) इतक्या होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

(गोषवारा) दि. ४/१०/२०२४

प्रकरण क्र.२०७ पशुसंवर्धन विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत श्री.विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या वेतनाबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका पशुसंवर्धन विभागात पशुवैद्यकीय अधिकारी, डॉ.विक्रम मधुकर निराटले यांची जा.क्र.मनपा/सा.प्र./1036/2017-18, दि.05/03/2018 रोजीच्या आदेशान्वये तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नेमणूक करण्यात आली आहे. मा. स्थायी समिती सभा दि.28/06/2022 ठराव क्र.115 अन्वये डॉ.विक्रम निरटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या ठोक मानधनात वाढ करुन प्रती मासिक ठोक मानधन रु.50,000/- इतके वेतन देणेस मंजूरी देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने मा.स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार डॉ.विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांना माहे सप्टेंबर-2022 पासून प्रती मासिक एकुण रु.50,000/- ठोक मानधन अदा करण्यात येत आहे.

तद्नंतर पुन:श्च पशुसंवर्धन विभागाकडून दि.06/04/2023 रोजी प्रस्ताव सादर करुन कार्यरत डॉ.विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या वेतनामध्ये रु.10,000/- (रु.50,000/- + रु.10,000/- = रु.60,000/-) इतकी वाढ करणेकरीता तत्कालीन मा.आयुक्त महोदय यांनी दि.17/04/2023 रोजी मंजूरी दिलेली आहे. सदर वेतनाबाबत खर्च पशुसंवर्धन विभाग "अस्थायी आस्थापना" या लेखाशिर्षातील तरतुदीमधून खर्च करण्यात येत आहे.

मा.आयुक्त यांनी दि.17/04/2023 रोजी मंजुरी दिल्यानुसार डॉ.विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांचे मासिक ठोक मानधन रु.50,000/- मध्ये रु.10,000/- इतकी वाढ करुन होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबतचा गोषवारा मा.प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या मंजूरीस्तव ठेवणेस शिफारस आहे.

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(संजय दोंदे)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय सभा
मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. २७/०९/२०२४ वेळ ११.२५
रजिस्टर नोंद अ.क्र. १९७ वर्ष २०२४-२५

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

D:\Samir PC Thok Mandhan मुदतवाढ प्रशासकीय गोषवारा.doc

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

दि. ०४/१० /2024

प्रकरण क्र.२०७ पशुसंवर्धन विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत श्री.विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या वेतनाबाबत

कार्यालयीन प्रस्ताव

मिरा भाईंदर महानगरपालिका पशुसंवर्धन विभागात पशुवैद्यकीय अधिकारी, डॉ.विक्रम मधुकर निराटले यांची जा.क्र.मनपा/सा.प्र./1036/2017-18, दि.05/03/2018 रोजीच्या आदेशान्वये तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नेमणूक करण्यात आली आहे. मा. स्थायी समिती सभा दि.28/06/2022 ठराव क्र.115 अन्वये डॉ.विक्रम निरटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या ठोक मानधनात वाढ करुन प्रती मासिक ठोक मानधन रु.50,000/- इतके वेतन देणेस मंजूरी देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने मा.स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार डॉ.विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांना माहे सप्टेंबर-2022 पासून प्रती मासिक एकुण रु.50,000/- ठोक मानधन अदा करण्यात येत आहे.

तदनंतर पुन:श्च पशुसंवर्धन विभागाकडून दि.06/04/2023 रोजी प्रस्ताव सादर करुन कार्यरत डॉ.विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या वेतनामध्ये रु.10,000/- (रु.50,000/- + रु.10,000/- = रु.60,000/-) इतकी वाढ करणेकरीता तत्कालीन मा.आयुक्त महोदय यांनी दि.17/04/2023 रोजी मंजूरी दिलेली आहे. सदर वेतनाबाबत खर्च पशुसंवर्धन विभाग "अस्थायी आस्थापना" या लेखाशिर्षातील तरतुदीमधून खर्च करण्यात येत आहे.

मा.आयुक्त यांनी दि.17/04/2023 रोजी मंजुरी दिल्यानुसार डॉ.विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांचे मासिक ठोक मानधन रु.50,000/- मध्ये रु.10,000/- इतकी वाढ करुन होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस विनंती आहे, असा प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २०७ दिनांक ०४/१० /2024

"पशुसंवर्धन विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत श्री.विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या वेतनाबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "डॉ.विक्रम निराटले, पशुवैद्यकीय अधिकारी यांचे मासिक ठोक मानधन रु.50,000/- मध्ये रु.10,000/- इतकी वाढ करुन होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे."

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Samir PC\Thok Mandhan\मुदतवाढ\प्रशासकीय ठराव - docx

आस्थापना विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

(गोषवारा)

२०८ दि. ४/१०/२०२४

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ एकूण 26 अतिरिक्त सुरक्षारक्षक नियुक्त करणेबाबत, महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचे समवेत नव्याने दि.15/09/2024 पासून ते दि.14/09/2025 पर्यंत एकूण 01 वर्षाकरीता करारनामा करून कार्यादेश देणेकरीता तसेच सदर कामी अपेक्षित खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

दि.19 ऑगस्ट 2024 रोजी सुरक्षारक्षक आढावा समितीची मा.अतिरिक्त आयुक्त, संभाजी पानपट्टे यांचे दालनात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये श्री.संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त, श्री.सचिन बांगर, उप-आयुक्त (सुरक्षा), श्रीम.कल्पना पिंपळे, उप-आयुक्त (उद्यान), श्री.संजय दोंदे, सहाय्यक आयुक्त (शिक्षण), श्री.योगेश गुणीजन, मिळकत व्यवस्थापक तसेच श्री.गितेंद्र भावसार, मुख्य सुरक्षा पर्यवेक्षीय अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये उद्यान विभाग, शिक्षण विभाग व मिळकत विभागामधील सुरक्षारक्षकांबाबत आढावा घेण्यात आला. उद्यान विभागांतर्गत मा.उप-आयुक्त (उद्यान) यांचेकडून दि.12/07/2024 रोजीच्या पत्रान्वये सुरक्षारक्षकांची मागणी प्राप्त झालेली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने तसेच शहरातील पुतळे/स्मारक बाबत माननीय आमदार श्रीम.गीता भरत जैन व पोलीस ठाणे यांच्याकडून जी मागणी प्राप्त झालेले आहे त्या अनुषंगाने आढावा बैठकीतील झालेल्या चर्चा नुसार खालील प्रमाणे सुरक्षारक्षक पुरवठा करणे आवश्यक आहे.

अ. क्र.	तपशिल	आवश्यक सुरक्षारक्षक			
		पहिली पाळी	दुसरी पाळी	तीसरी पाळी	एकुण
	मिळकत विभाग				
1.	डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा	0	0	01	01
2.	महाराणा प्रताप पुतळा	0	0	01	01
3.	धारावी जंजिरे किल्ला व चिमाजी अप्पा स्मारक	01	01	01	03
4.	घोडबंदर किल्ला	01	02	02	05
	उद्यान विभाग				
5.	राव तलाव उद्यान	0	01	01	02
6.	काका काकी गुलाब बाग उद्यान	0	01	01	02
7.	महाराणा प्रताप उद्यान	0	01	01	02
8.	रामभाऊ म्हाळगी उद्यान	0	01	01	02

9.	सातकरी तलाव	0	01	01	02
10.	आरक्षण क्र.178	0	01	01	02
11.	राणी लक्ष्मीबाई उद्यान	0	01	01	02
12.	काशिमीरा फ्लाय ओव्हर खालील उद्यान	0	01	01	02
एकूण		02	11	13	26

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ मा.प्रशासक तथा आयुक्त यांनी प्रशासकीय सभा दि.13/09/2023, प्रशासकीय ठराव क्र.203 अन्वये एकुण 250 व प्रशासकीय सभा दि.20/11/2023, प्रशासकीय ठराव क्र.257 अन्वये एकुण 211 पुरुष व महिला सुरक्षारक्षक पुरवठा करणेकामी मंजुरी दिल्यानुसार दि.03/11/2023 रोजीच्या कार्यादेशान्वये एकुण 250 व दि.01/12/2023 रोजीच्या कार्यादेशान्वये एकुण 211 सुरक्षारक्षकांबाबत महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांना कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडुन महानगरपालिकेस एकूण 461 सुरक्षारक्षकांचा पुरवठा करण्यात येत आहे. दि.02/07/2024 रोजीच्या सुधारित आदेशान्वये एकूण 65 सुरक्षारक्षकांची कपात करण्यात आलेली आहे. सदरचे सुरक्षारक्षक 250 मधून 31 व 211 मधून 34 अशा प्रमाणे कपात करण्यात आले आहेत. त्यानुसार 250 सुरक्षारक्षकांच्या करारनाम्यातील एकूण 219 सुरक्षारक्षक व 211 सुरक्षारक्षकांच्या करारनाम्यातील एकूण 177 सुरक्षारक्षक अशा प्रमाणे सद्यस्थितीत एकूण 396 सुरक्षारक्षक कार्यरत आहेत.

एकुण 250 सुरक्षारक्षकांचा करारनामा दि.14/09/2024 रोजी व एकुण 211 सुरक्षारक्षकांचा करारनामा दि.10/12/2024 रोजी संपुष्टात येणार आहे. यापूर्वी अतिरिक्त 211 सुरक्षारक्षकांची आवश्यकता भासल्याने सदर 211 सुरक्षारक्षकांबाबत स्वतंत्र करारनामा करण्यात आला होता. सदरचे दोन्ही करारनामे वेगवेगळ्या कालावधीत नुतनीकरण करण्याऐवजी एकाच वेळी नुतनीकरण करणे उचित होईल व याबाबत दि.20/08/2024 रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून महापालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षेचे कर्तव्य उत्तमरित्या पार पाडीत आहेत, तसेच त्यांना नेमून दिलेले कामकाज उत्कृष्टरित्या पार पाडत असून प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 करीता अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रणासाठी कार्यरत सुरक्षारक्षकांबाबत कुठल्याही प्रकारे प्रशासनाकडे तक्रार प्राप्त नाहीत. महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षकांची मुख्य कार्यालयात नेमणूक झालेनंतर एखाद्या मोर्चा/आंदोलनाबाबत नियंत्रण आलेले असून महापालिकेमार्फत अभ्यांगतांना नेमून दिलेल्या वेळेत प्रवेशाबाबतची जबाबदारी सुरक्षारक्षकांकडून योग्यरित्या हाताळण्यात येत आहे.

माहे 2024-25 या आर्थिक वर्षात "सुरक्षा व्यवस्था खर्च" या लेखाशिर्षाअंतर्गत महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करण्यात येणा-या सुरक्षारक्षकांप्रती होणा-या खर्चास तरतूद करण्यात आलेली आहे.

सबब सुरक्षारक्षकांची महापालिकेस आवश्यकता विचारात घेता सदर प्रस्तावातील उक्त तक्त्यानुसार एकुण 26 अतिरिक्त सुरक्षारक्षक पुरवठा करणेकरीता व सद्यस्थितीत कार्यरत एकूण 396 सुरक्षारक्षक अशा प्रमाणे 26+396 = 422 सुरक्षारक्षक पुरवठ्यासाठी नव्याने दि.15/09/2024 पासून ते दि.14/09/2025 पर्यंत एकुण 01 वर्षाकरीता करारनामा करणेकरीता तसेच सदर कामी अपेक्षित रक्कम रु.13,43,88,000/- (रु.तेरा कोटी त्रेचाळीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार मात्र) इतक्या खर्चास तसेच महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचे समवेत एकूण 422 सुरक्षारक्षकांकरीता करारनामा करून कार्यादेश देणेकरीता व आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(सचिन बांगर)
उप-आयुक्त (सुरक्षा)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. २७/०९/२०२४ वेळ ११.४५ वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. १९८ वर्ष २०२४-२५

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

D:\कृतिका\सुरक्षा रक्षक\प्रशासकीय गोषवारा 26 अतिरिक्त सुरक्षारक्षक नियुक्त करणेबाबत..doc

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दि. ४/१० /2024

प्रकरण क्र.२०८:- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ एकूण 26 अतिरिक्त सुरक्षारक्षक नियुक्त करणेबाबत, महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचे समवेत नव्याने दि.15/09/2024 पासून ते दि.14/09/2025 पर्यंत एकूण 01 वर्षाकरीता करारनामा करून कार्यादेश देणेकरीता तसेच सदर कामी अपेक्षित खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्र :- २०८

दि.19 ऑगस्ट 2024 रोजी सुरक्षारक्षक आढावा समितीची मा.अतिरिक्त आयुक्त, संभाजी पानपट्टे यांचे दालनात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये श्री.संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त, श्री.सचिन बांगर, उप-आयुक्त (सुरक्षा), श्रीम.कल्पना पिंपळे, उप-आयुक्त (उद्यान), श्री.संजय दोंदे, सहाय्यक आयुक्त (शिक्षण), श्री.योगेश गुणीजन, मिळकत व्यवस्थापक तसेच श्री.गितेंद्र भावसार, मुख्य सुरक्षा पर्यवेक्षीय अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये उद्यान विभाग, शिक्षण विभाग व मिळकत विभागामधील सुरक्षारक्षकांबाबत आढावा घेण्यात आला. उद्यान विभागांतर्गत मा.उप-आयुक्त (उद्यान) यांचेकडून दि.12/07/2024 रोजीच्या पत्रान्वये सुरक्षारक्षकांची मागणी प्राप्त झालेली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने तसेच शहरातील पुतळे/स्मारक बाबत माननीय आमदार श्रीम.गीता भरत जैन व पोलीस ठाणे यांच्याकडून जी मागणी प्राप्त झालेले आहे त्या अनुषंगाने आढावा बैठकीतील झालेल्या चर्चा नुसार खालील प्रमाणे सुरक्षारक्षक पुरवठा करणे आवश्यक आहे.

अ. क्र.	तपशिल	आवश्यक सुरक्षारक्षक			
		पहिली पाळी	दुसरी पाळी	तीसरी पाळी	एकुण
	मिळकत विभाग				
1.	डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा	0	0	01	01
2.	महाराणा प्रताप पुतळा	0	0	01	01
3.	धारावी जंजिरे किल्ला व चिमाजी अप्पा स्मारक	01	01	01	03
4.	घोडबंदर किल्ला	01	02	02	05
	उद्यान विभाग				
5.	राव तलाव उद्यान	0	01	01	02
6.	काका काकी गुलाब बाग उद्यान	0	01	01	02
7.	महाराणा प्रताप उद्यान	0	01	01	02
8.	रामभाऊ म्हाळगी उद्यान	0	01	01	02
9.	सातकरी तलाव	0	01	01	02
10.	आरक्षण क्र.178	0	01	01	02
11.	राणी लक्ष्मीबाई उद्यान	0	01	01	02
12.	काशिमीरा फ्लाय ओव्हर खालील उद्यान	0	01	01	02
	एकूण	02	11	13	26

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेच्या संरक्षणार्थ मा.प्रशासक तथा आयुक्त यांनी प्रशासकीय सभा दि.13/09/2023, प्रशासकीय ठराव क्र.203 अन्वये एकुण 250 व प्रशासकीय सभा दि.20/11/2023, प्रशासकीय ठराव क्र.257 अन्वये एकुण 211 पुरुष व महिला सुरक्षारक्षक पुरवठा करणेकामी मंजुरी दिल्यानुसार दि.03/11/2023 रोजीच्या कार्यादेशान्वये एकुण 250 व दि.01/12/2023 रोजीच्या कार्यादेशान्वये एकुण 211 सुरक्षारक्षकांबाबत महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांना कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडुन महानगरपालिकेस एकूण 461 सुरक्षारक्षकांचा पुरवठा करण्यात येत आहे. दि.02/07/2024 रोजीच्या सुधारित आदेशान्वये एकूण 65 सुरक्षारक्षकांची कपात करण्यात आलेली आहे. सदरचे सुरक्षारक्षक 250 मधून 31 व 211 मधून 34 अशा प्रमाणे कपात करण्यात आले आहेत. त्यानुसार 250 सुरक्षारक्षकांच्या करारनाम्यातील एकूण 219 सुरक्षारक्षक व 211 सुरक्षारक्षकांच्या करारनाम्यातील एकूण 177 सुरक्षारक्षक अशा प्रमाणे सद्यस्थितीत एकूण 396 सुरक्षारक्षक कार्यरत आहेत.

एकुण 250 सुरक्षारक्षकांचा करारनामा दि.14/09/2024 रोजी व एकुण 211 सुरक्षारक्षकांचा करारनामा दि.10/12/2024 रोजी संपुष्टात येणार आहे. यापूर्वी अतिरिक्त 211 सुरक्षारक्षकांची आवश्यकता भासल्याने सदर 211 सुरक्षारक्षकांबाबत स्वतंत्र करारनामा करण्यात आला होता. सदरचे दोन्ही करारनामे वेगवेगळ्या कालावधीत नुतनीकरण करण्याऐवजी एकाच वेळी नुतनीकरण करणे उचित होईल व याबाबत दि.20/08/2024 रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षक महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असून महापालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षेचे कर्तव्य उत्तमरित्या पार पाडीत आहेत, तसेच त्यांना नेमून दिलेले कामकाज उत्कृष्टरित्या पार पाडत असून प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 करीता अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रणासाठी कार्यरत सुरक्षारक्षकांबाबत कुठल्याही प्रकारे प्रशासनाकडे तक्रार प्राप्त नाहीत. महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडील सुरक्षारक्षकांची मुख्य कार्यालयात नेमणूक झालेनंतर एखाद्या मोर्चा/आंदोलनाबाबत नियंत्रण आलेले असून महापालिकेमार्फत अभ्यांगतांना नेमून दिलेल्या वेळेत प्रवेशाबाबतची जबाबदारी सुरक्षारक्षकांकडून योग्यरित्या हाताळण्यात येत आहे.

माहे 2024-25 या आर्थिक वर्षात "सुरक्षा व्यवस्था खर्च" या लेखाशिर्षाअंतर्गत महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेकडून पुरवठा करण्यात येणा-या सुरक्षारक्षकांप्रती होणा-या खर्चास तरतूद करण्यात आलेली आहे.

सबब सुरक्षारक्षकांची महापालिकेस आवश्यकता विचारात घेता सदर प्रस्तावातील उक्त तक्त्यानुसार एकुण 26 अतिरिक्त सुरक्षारक्षक पुरवठा करणेकरीता व सद्यस्थितीत कार्यरत एकूण 396 सुरक्षारक्षक अशा प्रमाणे 26+396 = 422 सुरक्षारक्षक पुरवठ्यासाठी नव्याने दि.15/09/2024 पासून ते दि.14/09/2025 पर्यंत एकुण 01 वर्षाकरीता करारनामा करणेकरीता तसेच सदर कामी अपेक्षित रक्कम रु.13,43,88,000/- (रु.तेरा कोटी त्रेचाळीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार मात्र) इतक्या खर्चास तसेच महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचे समवेत एकूण 422 सुरक्षारक्षकांकरीता करारनामा करून कार्यादेश देणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीकरीता सादर.

D:\कृतिका\सुरक्षा रक्षक\ठराव व मसुदा 26 अतिरिक्त सुरक्षारक्षक नियुक्त करणेबाबत..doc

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

दि. 04/90 /2024

(गोषवारा)

प्रकरण क्र. :- 209 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी ठोक मानधनावर कार्यरत श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर व श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांच्या मुदतीच्या नवीकरणाबाबत.

मा.प्रशासकीय सभा ठराव क्र.327, दि.18/01/2024 नुसार परिवहन उपक्रमासाठी ठोक मानधनावर डेपो मॅनेजर, ऑपरेशन मॅनेजर व ITS ऑफिसर (परिवहन) अधिकारी नियुक्त करणेस व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार ठोक मानधनावर डेपो मॅनेजर, ऑपरेशन मॅनेजर व ITS ऑफिसर (परिवहन) अधिकारी दि.05/03/2024 अन्वये जाहीर सूचना प्रसिध्द केली. सदर जाहीर सूचनेनूसार ठोक मानधनावर श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर यांना मासिक ठोक मानधन रु.50,000/- तसेच श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांना मासिक ठोक मानधन रु.45,000/- यावर दि.14/03/2024 रोजी नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहे.

सदर नियुक्ती आदेशामध्ये ठोक मानधनावर कार्यरत श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर व श्री. शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांची मुदत 06 महिन्यासाठी (दि.14/03/2024 ते दि.13/09/2024 रोजीपर्यंत) आहे. त्यांची मुदत दि.13/09/2024 रोजी संपुष्टात येणार आहे.

परिवहन विभागाने ठोक मानधनावर कार्यरत श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर व श्री. शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांची परिवहन विभागासाठी आवश्यकता असल्याने त्यांना मुदतवाढ देण्याबाबत दि.06/09/2024 रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरीता खर्च अस्थायी आस्थापना परिवहन उपक्रम या लेखाशिर्षात रु.1 कोटी तरतूद करण्यात आलेली असून रु.5,23870/- इतका खर्च झालेला असून रु.94,76,130/- इतकी तरतूद शिल्लक आहे. सदर लेखाशिर्षातून ठोक मानधनावर कार्यरत श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर मासिक ठोक मानधन रु.50,000/- असल्याने 06 महिन्याकरीता होणारा खर्च रु.3,00,000/- व श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांना मासिक ठोक मानधन रु.45,000/- असल्याने 06 महिन्याकरीता होणारा खर्च रु.2,70,000/- असे एकुण रु.5,70,000/- (अक्षरी पाच लाख सत्तर हजार मात्र) इतके ठोक मानधन भागविणे उचित होईल.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभाग हे अत्यावश्यक विभाग असल्याने त्या विभागातील कामकाजाची आवश्यकता पाहता ठोक मानधनावर श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर व श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांची मुदत

दि.13/09/2024 रोजी संपुष्टात येणार असल्याने त्यांना दि.14/09/2024 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.15/09/2024 ते दि.14/03/2025 पर्यंत 06 महिन्याकरीता मुदतीचे नवीकरण करणेस तसेच श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर (ठोक मासिक मानधन रु.50,000/-) व श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) (ठोक मासिक मानधन रु.45,000/-) यांना 06 महिन्याकरीता एकूण रु.5,70,000/- (अक्षरी पाच लाख सत्तर हजार मात्र) इतक्या होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(संजय दोंदे)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. ~~स्थायी समिती~~ सभा
गोषवारा प्राप्त दि. २५/९/२०२४ वेळ _____
रजिस्टर नोंद क्र. २०० वर्ष २०२४-२५

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

दि. ४ / १० /2024

प्रकरण क्र.२०९:- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी ठोक मानधनावर कार्यरत श्री. दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर व श्री. शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांच्या मुदतीच्या नवीकरणाबाबत..

कार्यालयीन प्रस्ताव

मा.प्रशासकीय सभा ठराव क्र.327, दि.18/01/2024 नुसार परिवहन उपक्रमासाठी ठोक मानधनावर डेपो मॅनेजर, ऑपरेशन मॅनेजर व ITS ऑफिसर (परिवहन) अधिकारी नियुक्त करणेस व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार ठोक मानधनावर डेपो मॅनेजर, ऑपरेशन मॅनेजर व ITS ऑफिसर (परिवहन) अधिकारी दि.05/03/2024 अन्वये जाहीर सूचना प्रसिध्द केली. सदर जाहीर सूचनेनूसार ठोक मानधनावर श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर यांना मासिक ठोक मानधन रु.50,000/- तसेच श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांना मासिक ठोक मानधन रु.45,000/- यावर दि.14/03/2024 रोजी नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहे.

सदर नियुक्ती आदेशामध्ये ठोक मानधनावर कार्यरत श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर व श्री. शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांची मुदत 06 महिन्यासाठी (दि.14/03/2024 ते दि.13/09/2024 रोजीपर्यंत) आहे. त्यांची मुदत दि.13/09/2024 रोजी संपृष्टात येणार आहे.

परिवहन विभागाने ठोक मानधनावर कार्यरत श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर व श्री. शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांची परिवहन विभागासाठी आवश्यकता असल्याने त्यांना मुदतवाढ देण्याबाबत दि.06/09/2024 रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरीता खर्च अस्थायी आस्थापना परिवहन उपक्रम या लेखाशिर्षात रु.1 कोटी तरतूद करण्यात आलेली असून रु.5,23870/- इतका खर्च झालेला असून रु.94,76,130/- इतकी तरतूद शिल्लक आहे. सदर लेखाशिर्षातून ठोक मानधनावर कार्यरत श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर मासिक ठोक मानधन रु.50,000/- असल्याने 06 महिन्याकरीता होणारा खर्च रु.3,00,000/- व श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांना मासिक ठोक मानधन रु.45,000/- असल्याने 06 महिन्याकरीता होणारा खर्च रु.2,70,000/- असे एकुण रु.5,70,000/- (अक्षरी पाच लाख सत्तर हजार मात्र) इतके ठोक मानधन भागविणे उचित होईल.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभाग हे अत्यावश्यक विभाग असल्याने त्या विभागातील कामकाजाची आवश्यकता पाहता ठोक मानधनावर श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर व श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांची मुदत दि.13/09/2024 रोजी संपुष्टात येणार असल्याने त्यांना दि.14/09/2024 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.15/09/2024 ते दि.14/03/2025 पर्यंत 06 महिन्याकरीता मुदतीचे नवीकरण करणेस तसेच श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर (ठोक मासिक मानधन रु.50,000/-) व श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) (ठोक मासिक मानधन रु.45,000/-) यांना 06 महिन्याकरीता एकूण रु.5,70,000/- (अक्षरी पाच लाख सत्तर हजार मात्र) इतक्या होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळावी असा कार्यालयीन प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २०९ दिनांक ०४/१० /2024

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी ठोक मानधनावर कार्यरत श्री. दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर व श्री. शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांच्या मुदतीच्या नवीकरणाबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभाग हे अत्यावश्यक विभाग असल्याने त्या विभागातील कामकाजाची आवश्यकता पाहता ठोक मानधनावर श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर व श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) यांची मुदत दि.13/09/2024 रोजी संपुष्टात येणार असल्याने त्यांना दि.14/09/2024 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.15/09/2024 ते दि.14/03/2025 पर्यंत 06 महिन्याकरीता मुदतीचे नवीकरण करणेस तसेच श्री.दिपक अनंत पाटील, ऑपरेशन मॅनेजर (ठोक मासिक मानधन रु.50,000/-) व श्री.शशिकांत शिवाजी सरडे, ITS ऑफिसर (परिवहन) (ठोक मासिक मानधन रु.45,000/-) यांच्या 06 महिन्याकरीता एकूण रु.5,70,000/- (अक्षरी पाच लाख सत्तर हजार मात्र) इतक्या होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य विभाग

// गोषवारा //

प्रकरण क्र.:- २९० दि. ४/१०/२०२४

विषय : भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयाकरीता व आरोग्य केंद्राकरीता हाऊसकिपींग साठी मागविण्यात आलेल्या निविदेचे दर स्विकारणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड येथील भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयाकरीता व आरोग्य केंद्राकरीता हाऊसकिपींग साठी विविध वृत्तपत्रात जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करून ई-टेंडर मार्फत दि. १६/०२/२०२४ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस प्रतिसाद म्हणून चार निविदाकारांनी निविदा सादर केलेले असल्याने दि.२६/०२/२०२४ रोजी निविदेचे तांत्रिक लिफाफे उघडयात आले असता मे. अमृत इंटरप्रायझेस, मे. एक्झीमीएस मेनेजमेंट प्रा. लि., मे. सुमित फेसिलीटीझ लि. यांनी निविदेकरीता आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या दरांचे लिफाफे उघडणेस मा. निविदा निवड समितीने दि.०५/०३/२०२४ व मा. आयुक्त यांनी दि.११/०३/२०२४ रोजी मंजुरी दिलेली होती. या अनुषंगाने दि.१३/०३/२०२४ रोजी दराचे लिफाफे उघडण्यात आले असता सर्व निविदाकारांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

SR. NO	DESCRIPTION	TOTAL PER DAY PER PERSON AMOUNT (EXCLUDING GST)			
		AMRUT ENTERPRISES	EXIMIUS MANAGEMENT PVT. LTD	SUMEET FACILITIES LIMITED	RATE OFFER NEGOTIATION
1	HOUSEKEEPING CONTRACT FOR DAILTY CLEANING IN BHARATRATNA INDIRA GANDHI HOSPITAL AND HEALTH POSTS.	1369.00 (979 + 390)	1293.74 (979 + 314.74)	1380.00 (979 + 400)	1277.74 (979 + 298.74)

उपरोक्त प्रमाणे तकत्याच्या अभ्याकरीत मे. एक्जीमीएस मेनेजमेंट प्रा. लि. यांनी कमी दराची निविदा सादर केलेली असल्याने त्यांना वाटाघाटी करणेकरीता बोलविले असता त्यांनी दर वाटाघाटी अतिरिक्त रु.१२७७.७४ दर सादर केलेले आहे. सदर दरामधून रु.९७९/- हे किमान वेतन आयोगानुसार प्रती दिन/प्रती कर्मचारी असून रु.२९८.७४ हे कर्मचाऱ्यांचे युनिफॉर्म, सुरक्षा साहित्य, कॅमिकल आणि कन्जुमेबलस्, सफाई उपकरणे व सर्विस चार्ज याकरीताचे आहे. सदरचा खर्च Cost Breakup नुसार योग्य असल्याचे विभागाने प्रमाणित केलेले आहे. सादर केलेल्या दराची तुलना सद्यस्थितीतील बाजारभावाशी केली असता ते योग्य आहेत त्यानुसार वाटाघाटीअंती सादर केलेले दर स्विकारणेस मा. निविदा निवड समितीने दि.२९/०८/२०२४ रोजी मंजुरी दिलेली आहे. .

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२१)/नवि १४ दि.२६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व १(ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासकीय नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकारी प्राप्त झाले आहेत.

तरी सदर प्राप्त अधिकारात वरीलनमूद प्रस्तावास मान्यता देणेस शिफारस आहे.

(प्रसाद शिंगटे)
उपायुक्त (सार्व.आ.वि.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\Rahul Bhoir\DAILYSIS\गोषवारा- हाऊसकिपींग.doc

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दि. ४ / १० /२०२४ रोजी

विषय क्र.:- २१० मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज.

कार्यालयीन प्रस्तावना

विषय :- २१० भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयाकरीता व आरोग्य केंद्राकरीता हाऊसकिपींग साठी मागविण्यात आलेल्या निविदेचे दर स्विकारणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड येथील भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयाकरीता व आरोग्य केंद्राकरीता हाऊसकिपींग साठी विविध वृत्तपत्रात जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करून ई-टेंडर मार्फत दि. १६/०२/२०२४ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस प्रतिसाद म्हणून चार निविदाकारांनी निविदा सादर केलेले असल्याने दि.२६/०२/२०२४ रोजी निविदेचे तांत्रिक लिफाफे उघडयात आले असता मे. अमृत इंटरप्रायझेस, मे. एक्झीमीएस मेनेजमेंट प्रा. लि., मे. सुमित फेसिलीटीझ लि. यांनी निविदेकरीता आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांच्या दरांचे लिफाफे उघडणेस मा. निविदा निवड समितीने दि.०५/०३/२०२४ व मा. आयुक्त यांनी दि.११/०३/२०२४ रोजी मंजुरी दिलेली होती. या अनुषंगाने दि.१३/०३/२०२४ रोजी दराचे लिफाफे उघडण्यात आले असता सर्व निविदाकारांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

SR. NO	DESCRIPTION	TOTAL PER DAY PER PERSON AMOUNT (EXCLUDING GST)			
		AMRUT ENTERPRISES	EXIMIUS MANAGEMENT PVT. LTD	SUMEET FACILITIES LIMITED	RATE OFFER NEGOTIATION
1	HOUSEKEEPING CONTRACT FOR DAILTY CLEANING IN BHARATRATNA INDIRA GANDHI HOSPITAL AND HEALTH POSTS.	1369.00 (979 + 390)	**1293.74 (979 + 314.74)**	1380.00 (979 + 400)	**1277.74 (979 + 298.74)**

उपरोक्त प्रमाणे तकत्याच्या अभ्याकरीत मे. एक्जीमीएस मेनेजमेंट प्रा. लि. यांनी कमी दराची निविदा सादर केलेली असल्याने त्यांना वाटाघाटी करणेकरीता बोलविले असता त्यांनी दर वाटाघाटी अतिरिक्त रु.१२७७.७४ दर सादर केलेले आहे. सदर दरामधून रु.९७९/- हे किमान वेतन आयोगानुसार प्रती दिन/प्रती कर्मचारी असून रु.२९८.७४ हे कर्मचाऱ्यांचे युनिफॉर्म, सुरक्षा साहित्य, कॅमिकल आणि कन्जुमेबलस्, सफाई उपकरणे व सर्विस चार्ज याकरीताचे आहे. सदरचा खर्च Cost Breakup नुसार योग्य असल्याचे विभागाने प्रमाणित केलेले आहे. सादर केलेल्या दराची तुलना सद्यस्थितीतील बाजारभावाशी केली असता ते योग्य आहेत त्यानुसार वाटाघाटीअंती सादर केलेले दर स्विकारणेस मा. निविदा निवड समितीने दि.२९/०८/२०२४ रोजी मंजुरी दिलेली आहे.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ२०२०/प्र.क्र.७१ (भाग २१)/नवि-१४, दि.२६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी सदर प्राप्त अधिकारात वरीलप्रमाणे नमूद प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. (२१०) दि. ४/१० /२०२४

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड येथील भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयाकरीता व आरोग्य केंद्राकरीता हाऊसकिपींगसाठी मागविण्यात आलेले निविदेकरीता "मे. एक्जीमीएस मेनेजमेंट प्रा. लि." यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर स्विकारणेचा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. सदर कामी कार्यादेश त्वरीत देण्यात यावेत.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

प्रशासकिय गोषवारा क्र.२९१ दि. ४/१०/2024

प्रकरण क्र. २९१ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते, सार्वजनिक ठिकाणे यावर पडलेले डेब्रिज, माती उचलुन वाहतुक करणे कामास मुदतवाढ व आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते, सार्वजनिक ठिकाणी यावर पडलेली डेब्रीज, माती उचलुन वाहतूक करणेकामी मा. आयुक्त यांनी दि.17/03/2023 अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. प्राप्त मंजुरीनुसार सार्व. बाधकांम विभागामार्फत जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करुन मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची कमी दराची निविदा मा. प्रशासकिय ठराव दि.24/07/2023 रोजी मंजुरी दिली आहे. त्यानुसार सार्व. बांधकाम विभागामार्फत करारनामा करुन दि.04/08/2023 रोजी मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे.

सदर कार्यादेशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते व सार्वजनिक ठिकाणी यावर पडलेली डेब्रीज, माती जेसीबी / कॉंमप्रेसर ब्रेकर मशीन/ डंपर / टोरस/ मनुष्यबळ पुरवठा करून उचलुन घेऊन वाहतुक करणेची कामे करण्यात येत होती. मा. आयुक्त यांनी दि.30/06/2024 रोजी पासुन काम बंद करुन Construction and Demolition Act 2016 बाबत नविन धोरण निश्चित करणेबाबत निर्देश दिले आहे.

सदर निर्देशानुसार मा. प्रशासकिय ठराव क्र.107 दि.14/08/2024 अन्वये खाजगी एजन्सी यांचे पॅनल नियुक्त करणेकामी अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) मागविणे कामी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी दिली आहे. त्यानुसार दि.17/08/2024 रोजीच्या दै. महासागर व दै. तरुण भारत या वृत्तपत्रात व ई- टेडरींग संकेतस्थळावर अनुभवी कंपनी अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) मागविणेचा प्रस्ताव प्रसिध्द करुन दि.03/09/2024 पर्यंत मागविण्यात आले आहे. सदर निविदा अंतिम होणेस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

मा. अति. आयुक्त व मा. उपायुक्त (घ.व्य.) यांनी शहरात विविध ठिकाणी पाहणी दरम्यान शहरात मोठया प्रमाणात सार्वजनिक ठिकाणी मोठया प्रमाणात रॅबिट, फर्निचर पडलेले आढळुन आल्याने नियमित उचलणे आवश्यक आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान

अंतर्गत स्वच्छ Express of Interest अंतिम होईपर्यंत सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात फर्निचर नियमित उचलण्याबाबत सद्यस्थितीत कार्यरत असलेले ठेकेदार मे. आशापुरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांना मौखिक आदेश दिलेले आहे.

वरीलप्रमाणे मनपा क्षेत्रातील C & D Waste वाहतुक करणेकामी खाजगी एजन्सी यांचे पॅनल नियुक्त कामी मागविण्यात आलेले आलेले Express of Interest अंतिम होईपर्यंत सद्यस्थितीत कार्यरत असलेले कंत्राटदार मे. आशापुरा कंस्टक्शन कंपनी यांना सार्वजनिक रस्ते व सार्वजनिक ठिकाणी यावर पडलेली डेब्रीज, माती उचलुन वाहतुक करणेकामी येणारा खर्च सार्व. बांधकाम विभागाकडील सन 2024-25 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील सार्वजनिक रस्ते, देखभाल/ दुरूस्ती पुर्न : पृष्ठीकरण या लेखाशिर्षाखाली उपलब्ध तरतुदीतुन करण्यात येईल. तसेच मा. आयुक्त यांनी दि.12/09/2024 रोजी दि.01/07/2024 ते दि.30/09/2024 रोजी पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

तरी, मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते, सार्वजनिक ठिकाणे यावर पडलेले डेब्रिज, माती उचलुन वाहतुक करणे कामास दि.01/07/2024 ते दि.30/09/2024 येणाऱ्या मुदतवाढ तसेच येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य)
मिरा भाईदर महानगरपालिका

मा. ~~महासभा / स्थायी~~ समिती सभा
पोचपावती प्राप्त दि. 20/01/2025 3:20 वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. 209 2024/25
लिपीक 20/01/25
सचिव विभाग
मिरा-भाईदर महानगरपालिका

मिरा भाईदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

प्रशासकिय ठराव क्र.२११ दि. ०४/१० /2024

